# महाराष्ट्र विधानपरिषद
## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## शुक्रवार, दिनांक २८ जुलै, २०२३
## (सकाळी १०.३० ते ११.४५ वाजता)

**लक्षवेधी सूचना — (म.वि.प. नियम १०१ अन्वये) —**

**(बुधवार, दिनांक २६ जुलै, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली प्रलंबित लक्षवेधी सूचना) — [अनुक्रमांक (१)] —**

(१) **श्री.राजेश राठोड, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **इतर मागास बहुजन कल्याण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यातील विमुक्त जाती व भटक्या जमातीमध्ये समावेश असलेला 'राजपूत भामटा' या जमातीतील 'भामटा' हा शब्द वगळण्यात येईल अशी घोषणा मा.मुख्यमंत्री यांनी दिनांक १४ मे, २०२३ रोजी औरंगाबाद येथील जाहीर सभेत करण्यात येणे, सदर आश्वासनामुळे राजपूत भामटा, बंजारा, लमान, कैकाडी, मानस जोगी, माकडवाले, नंदीबैलवाले, अस्वलवाले, छप्पर बंद यासारख्या जमातीचे आरक्षण धोक्यात येण्याची शक्यता असून विमुक्त 'अ' गटातील आरक्षणावर अतिक्रमण असलेल्या तक्रारी शासनाकडे आले असणे, 'राजपूत भामटा' समाजाची लोकसंख्या राज्यात अत्यल्प असून राजपूत भामटा नसलेल्या अनेक व्यक्तींनी खोट्या प्रमाणपत्राच्या आधारावर आरक्षण मिळवण्याच्या तक्रारीबाबत तसेच भटके विभक्तीच्या अ आणि ब गटातील अत्यंत मागासलेल्या जमातींना संरक्षण देणे त्याच्या आरक्षणावरील अतिक्रमण थांबवणे आणि त्यांच्या शैक्षणिक आर्थिक विकासाचा कार्यक्रम आखणे या आणि अन्य मागण्याबाबत शासनाने कोणती कारवाई केलेली नसणे, त्यामुळे या समाजाच्या लोकांमध्ये पसरलेला असंतोषाची भावना निर्माण होणे, शासनाने याबाबत तातडीने करावयाची कारवाई व राज्य शासनाची प्रतिक्रिया."

**(बुधवार, दिनांक २६ जुलै, २०२३ व गुरुवार, दिनांक २७ जुलै, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या प्रलंबित लक्षवेधी सूचना) — [अनुक्रमांक (२) व (३)] —**

(२) **श्री.राजहंस सिंह वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **वने मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"संजय गांधी राष्ट्रीय उद्यान येथील दिंडोशी क्षेत्रातील काही झोपडीवासियांनी सन २००१ मध्ये वन खात्याच्या नियमानुसार सन १९९५ पूर्वीचे म्हणून ७ हजार रुपये भरले असून त्यांना चांदवली येथे घरे मिळालेली असणे, त्यानंतर अंदाजे १५ हजार रहिवाशांनी सन २००८ मध्ये नियमानुसार ७

हजार रुपये भरले, परंतु त्यांना १५ वर्षे होऊन सुद्धा त्यांना अद्यापपर्यंत घरे मिळाली नसणे, संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात आंबेडकर नगर, गौतम नगर, सिद्धार्थ नगर, संजय नगर, कालीमाता नगर, आप्पापाडा, जामऋषी नगर, बंजारी पाडा, शांती नगर, पिंपरी पाडा, मातंग गड, सावित्रीबाई फुले नगर, क्रांती नगर, दामू नगर पासून मागाठाणे पर्यंत सदर जागा वन विभागामध्ये असणे, या उर्वरित झोपडीवासीयांचा सहानुभूतीपूर्वक विचार करून त्यांचेही पुनर्वसन करावे, अशी मागणी केली असणे, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान येथील पात्र अंदाजे १५ हजार लोकसंख्येला, वन विभागाच्या जागेवर वास्तव्य करणाऱ्या लोकांचे पुनर्वसन करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(३) **श्री.नरेंद्र दराडे**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **ग्रामविकास मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यातील निवृत्त शासकीय कर्मचारी, निमशासकीय कर्मचारी आणि शिक्षक यांना वेळवर निवृत्तीवेतन (पेन्शन) मिळत नसणे, दर महिन्याच्या १ तारखेला पेन्शन बँक खात्यात जमा होणे आवश्यक असताना अनेक वेळा २० ते २५ तारखेनंतर पेन्शन जमा होत असल्याचे निदर्शनास येणे, विशेषत: नाशिक जिल्ह्यातील अनेक पेन्शनधारकांच्या लोकप्रतिनिधींकडे तक्रारी प्राप्त होणे, परिणामी पेन्शनधारकांची होणारी आर्थिक कोंडी, पेन्शनधारक हे वयोवृध्द असल्यामुळे त्यांना आजारपणात औषधोपचार वेळेवर घेणे आवश्यक असतानाही पेन्शन वेळेवर होत नसल्यामुळे त्यांना औषधोपचारासाठी योग्य त्यावेळी पैसे उपलब्ध न होणे, परिणामी त्यांच्यात पसरलेली तीव्र असंतोषाची भावना व त्यांच्यात निर्माण झालेली वाढती असुरक्षितता, शासनाने यासंदर्भात तातडीने चौकशी करुन पेन्शनधारकांची आर्थिक कुचंबणा होऊ नये याकरीता दर महिन्याच्या १ तारखेला त्यांच्या बँक खात्यात पेन्शनची रक्कम जमा करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(गुरुवार, दिनांक २७ जुलै, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या प्रलंबित लक्षवेधी सूचना)** — **[अनुक्रमांक (४) व (१४)]** —

(४) **डॉ.मनिषा कायंदे**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या संयुक्त गट -ब पूर्व परीक्षा दिनांक ८ ऑक्टोबर, २०२२ रोजी झालेली असणे, सदर परीक्षेचा निकाल जवळपास १० महिन्यानंतर दिनांक ५ जुलै, २०२३ रोजी जाहीर होणे, या परीक्षेमध्ये हजारो उमेदवार PSI पदावर पुन्हा पुन्हा पात्र ठरल्यामुळे PSI परीक्षेचा आजपर्यंतचा

अग्रिम प्रत

सर्वात जास्त कट ऑफ जाहीर होणे, संयुक्त गट-ब पूर्व परीक्षा २०२२ मध्ये PSI करिता निवड झालेले जवळपास दीड हजार विद्यार्थी यापूर्वी पासून शासनात विविध वरिष्ठ पदावर कार्यरत असणे, यापूर्वी निवड झालेल्या उमेदवारांनी विविध पदांवर जॉईन होऊन देखील आजपर्यंत ऑप्टिंग आऊट केले नसल्यामुळे सदर परीक्षेत PSI पदाकरिताचा कटऑफ जास्त येऊन हजारो इच्छुक उमेदवार थोड्याफार मार्कांनी अपात्र ठरत असणे, तसेच येत्या २०२३ पासून आयोगाच्या अभ्यासक्रमात देखील बदल होत असल्याने परीक्षार्थीमध्ये नाराजी असणे, संयुक्त गट -ब पूर्व परीक्षा २०२२ करिता ASO पदासाठी २१.१४%, Sub Registrar's पदासाठी १८.४२% व STI पदासाठी २१.७७% उमेदवारांना मुख्य परीक्षेची संधी दिलेली जात असतानाच PSI पदासाठी केवळ १६.६४% उमेदवारांनाच मुख्य परीक्षेची संधी दिली जाणे, त्यामुळे PSI इच्छुक उमेदवारांनी आयोगाने विशेष अधिकार वापरून २० टक्क्यापर्यंत उमेदवारांना मुख्य परीक्षेची संधी देण्याची मागणी करणे, तसेच यापूर्वी प्रशासनात कार्यरत असणाऱ्या उमेदवारांकरिता ऑप्टिंग आऊट पर्यायासाठी कालमर्यादा निश्चित करण्याची गरज असणे, त्यामुळे सर्वसामान्य परीक्षार्थीमध्ये पसरलेला असंतोष, याबाबत राज्य शासनाने आयोगाकडे संयुक्त गट- ब पूर्व परीक्षा २०२२ च्या निकालाबाबत उचित मागण्यांसह योग्य पाठपुरावा करून संबंधित विद्यार्थ्यांना न्याय देण्यासाठी घेतलेली भूमिका व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

(५) **सर्वश्री सतिश चव्हाण**, विक्रम काळे, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"खुलताबाद शहर हद्दीत ३ कि.मी. अंतरावर लिंगमळा (लालमाती वस्ती) येथे मागासवर्गीय वस्ती असून तेथे ३५ ते ४० कुटुंब वास्तवास असून जवळपास २७५ लोकसंख्या असणे, सदर ठिकाणचे नागरिक मोल मजुरी करुन उदरनिर्वाह करत असणे, या वस्तीकडे नगरपालिका प्रशासनाने दुर्लक्ष केले असून तेथे कायमस्वरुपी पाणी पुरवठा योजना, रस्ते, पथदिवे या नागरी सोयी-सुविधा दिलेल्या नसणे, वस्तीतील नागरिक हे शेत वस्तीवर राहत असल्याने त्यांच्या नावाची ७/१२ मध्ये नोंद असणे, सन २०१७ मध्ये ७ ते ८ कुटुंबाना घरकुल मंजूर झाले असणे, मात्र त्यांच्याकडे नमुना नं.८ चा उतारा नसल्यामुळे सदर घरकुल रदद करण्यात आले असणे, वस्तीवर जाण्या-येण्यासाठी रस्ता नसणे, डोंगराळ भाग असल्यामुळे कायम हिस्त्र पशुंची भिती असणे, सदर वस्तीवर किमान २५ मुले-मुली १ ते ४ वयोगटातील असणे, सदर बालके शिक्षणापासून वंचित राहण्याची भिती निर्माण झालेली असणे, बालकांना अंगणवाडीची नितांत गरज असणे, तसेच अंगणवाडी नसल्यामुळे बालकांना पोषण आहार मिळत नसल्याने २५ बालके कुपोषणाच्या विळख्यात

अग्रिम प्रत

सापडण्याची शक्यता असणे, खुलताबाद नगरपरिषद प्रशासन जाणून बुजून दुर्लक्ष करत असणे, खुलताबाद नगरपरिषद हद्दीत प्रभाग क्र.१ मध्ये सदर वस्तीतील नागरिकांची मतदान यादीत नावाची नोंद असणे, या बाबतीत शासनाने तात्काळ चौकशी करुन खुलताबाद नगरपालिका प्रशासनाने लिंगमळा (लालमाती वस्ती) तील नागरिकांना आवश्यक त्या सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्याविषयी कार्यवाही करण्याची होत असलेली मागणी यावर शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(६) **प्रा.राम शिंदे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मे. कॅनकेअर ट्रस्ट या संस्थेमार्फत उभारण्यात येणाऱ्या कर्करोग रुग्णालयाच्या नावामध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या नावाचा उल्लेख करण्याबाबत महापालिका मुख्यालयातील अध्यक्ष, स्थायी समिती दालनामध्ये दिनांक २३ एप्रिल, २०१८ रोजी झालेल्या बैठकीत निर्णय घेण्यात येणे, सदर सभेच्या निर्णयानुसार रे रोड, माझगाव येथील न.भु. क्र. २५४ (भाग) येथील अहिल्याबाई होळकर रुग्णालयाच्या जागेवर मे. कॅनकेअर ट्रस्ट या संस्थेमार्फत उभारण्यात आलेल्या रुग्णालयाचे नामकरण पूर्वीच्या नावांसह म्हणजे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कॅनकेअर ट्रस्ट असे नामकरण करण्यात यावे व रुग्णालयाच्या इमारतीवर दर्शनी भागावर तसा नाम फलक लावण्यात यावा अशी मागणी लोकप्रतिनिधींनी दिनांक ७ जुलै, २०२३ रोजी मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय यांच्याकडे एका पत्राद्वारे करण्यात येणे, परंतु, अद्यापपर्यंत सदर मागणीवर कोणत्याही स्वरुपाची कार्यवाही न होणे, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे सामाजिक योगदान विचारात घेता शासनाने तातडीने सदर मागणीवर निर्णय घेण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया."

(७) **सर्वश्री सतेज ऊर्फ बंटी पाटील,** अभिजित वंजारी, अशोक ऊर्फ भाई जगताप, राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, डॉ. प्रज्ञा सातव, सर्वश्री सुधाकर अडबाले, धीरज लिंगाडे, जयंत पाटील, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **महसूल मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"गायरान जमिनीवर केलेले अतिक्रमण हटवण्यासाठी कोल्हापूर जिल्ह्यातील अनेक मिळकत धारकांना महसूल विभागामार्फत माहे जून, २०२३ च्या शेवटच्या आठवड्याच्या दरम्यान नोटीस बजावण्यात येणे, कोल्हापूर जिल्ह्यातील आनंदनगर, वैभवनगर, सारखवाडी या भागातील जमिनीवर १९८० पासून शासनामार्फत गरीब व बेघर लोकांना इंदिरा घरकुल

योजनेअंतर्गत घरे बांधून देण्यात असून काही नागरिकांना जागा उपलब्ध करून देण्यात येणे, ग्रामपंचायतीने बजावलेल्या नोटीसला उत्तर देऊनही महसूल विभागाकडून पुन्हा नोटीस बजावण्यात येणे, त्यामुळे गरीब व बेघर स्थानिक नागरिकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, नाराजीची भावना, याबाबत शासनाने चौकशी करून गायरान जमिनीवर घरकुल योजनेतून दिलेल्या घरांना संरक्षण देऊन गरीब व बेघर जनतेला दिलासा देण्याची आवश्यकता व यावर शासनाची प्रतिक्रिया."

(८) **सर्वश्री विजय ऊर्फ भाई गिरकर, प्रविण दरेकर,** ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, सर्वश्री रमेशदादा पाटील, रामदास आंबटकर, निलय नाईक, प्रसाद लाड, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **महसूल मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"महाराष्ट्र राज्यात बहुतांश शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी नागरिकांना अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) सादर करावे लागत असते, त्याचप्रमाणे महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाकरिता विविध सवलती मिळविण्यासाठी देखील अधिवास प्रमाणपत्राची आवश्यकता लागत असल्याची बाब निदर्शनास येणे, महाराष्ट्र राज्यात अधिवास प्रमाणपत्र काढण्यासाठी असणाऱ्या जाचक अटींमुळे नागरिकांना सदर प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अनेक अडचणींचा सामना करावा लागत असल्याची बाब निदर्शनास येणे, राज्यात जन्म झालेल्या नागरिकांना देखील अधिवास प्रमाणपत्र मिळविण्यासाठी मागील दहा ते पंधरा वर्षांची कागदपत्रे सादर करावी लागत असणे, सदर कागदपत्रे वेळेवर उपलब्ध न झाल्यामुळे अनेक विद्यार्थी हक्काच्या शिक्षणापासून वंचित राहत असणे, त्याचप्रमाणे सध्या बारकोड प्रणालीचे अधिवास प्रमाणपत्र आल्यामुळे जुनी अधिवास प्रमाणपत्र ग्राह्य धरली जात नसल्याचे निदर्शनास येणे, परिणामी नागरिकांमध्ये शासनाप्रती तीव्र असंतोषाची भावना निर्माण होणे, राज्यातील नागरिकांना सुलभतेने अधिवास प्रमाणपत्र मिळविण्यासाठी असलेल्या जाचक अटी शिथील करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका."

(९) **श्री.आमश्या पाडवी**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मत्स्यव्यवसाय मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"कोकण किनारपट्टी क्षेत्रात अनधिकृत होत असलेल्या मच्छिमारीबाबत विशेषतः रायगड जिल्ह्यातील अलिबाग तालुक्यात पारंपारिक मच्छिमार व पर्ससिन मच्छिमार यांच्यात वाद असणे, उक्त तालुक्यात अनधिकृत पर्ससिन व एल.ई.डी धारक बेकायदेशीररित्या मच्छिमारी करीत असणे, उक्त मच्छिमारांकडून तत्कालीन परवाना अधिकारी यांनी अधिकाराचा गैरवापर

अप्रकाशित प्रत

करुन मच्छिमारांकडून पैसे उकळणे, याबाबत स्थानिक मच्छिमार संघटना व नागरिकांनी तक्रार करुनही त्याकडे करण्यात आलेले जाणीवपूर्वक दुर्लक्ष, त्यामुळे परवानाधारक पारंपारिक मच्छिमार व पर्ससिन मच्छिमार यांचे मोठ्या प्रमाणात झालेले नुकसान, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन परवाना अधिकारी यांच्यावर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(१०) **श्री. शशिकांत शिंदे**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उद्योग मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मौजे पुसेगाव / नेर (ता.खटाव, जि.सातारा) येथील औद्योगिक वसाहतीसाठी शासनाने सन १९९२-९३ मध्ये तेथील शेतकऱ्यांच्या जमिनी संपादीत केलेल्या असणे, जमिन संपादीत करताना संबंधित शेतकऱ्यांना विश्वासात न घेता किंवा त्यांची परवानगी न घेता शासनाने जमिनी संपादीत केल्या असून जमिनी संपादीत केल्यानंतर शेतकऱ्यांना त्याची कल्पना देऊन शेतकऱ्यांच्या ७/१२ उताऱ्यावर एम.आय.डी.सी. चे शिक्के मारण्यात येणे, सध्या या क्षेत्रावर बागायती पिके ऊस, कांदा, बटाटा इत्यादी शेतकरी घेत असणे, शेतकऱ्यांच्या ७/१२ उताऱ्यावर एम.आय.डी.सी. चे शिक्के असल्यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीचा व्यवहार करता येत नसणे, त्यामुळे संबधित शेतकऱ्यांनी त्यांच्या ७/१२ उताऱ्यावरील एम.आय.डी.सी. चे शिक्के काढून टाकण्याबाबत सन २०१८ पासून सातत्याने शासनाकडे पत्रव्यवहार करुनसूध्दा ते शिक्के काढण्यात न आल्यामुळे सर्व शेतकऱ्यांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, हे शिक्के शेतकऱ्यांच्या ७/१२ उताऱ्यावरुन काढण्याबाबत शेतकऱ्यांनी दिनांक १४ एप्रिल, २०२३ रोजी पून्हा लेखी पत्राद्वारे शासनाकडे केलेली मागणी, यावर शासनाने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

(११) **श्रीमती उमा खापरे,** सर्वश्री प्रविण दरेकर, प्रसाद लाड, रमेशदादा पाटील, ज्ञानेश्वर म्हात्रे, महादेव जानकर, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"देशात दर दहा हजार व्यक्ती मागे एक हेमोफिलिया ए चा रुग्ण असून दर चाळीस हजार व्यक्ती मागे बी चा रुग्ण आणि दर दोन लाख व्यक्तींमागे सी या प्रकारचा रुग्ण आढळत असणे, सदर रुग्ण तपासण्याची सोय भारतामध्ये अतिशय कमी ठिकाणी असून तपासणी करण्याच्या प्रयोगशाळा कमीच असणे, त्यामुळे अनेक वेळा आजाराचे नेमके निदान होऊ शकत नसल्याने हेमोफिलिया याविषयी जागृती आणि उपचार केंद्र वाढवण्याची गरज असणे, हेमोफिलियाची भारतासाठी एक नोंदणी असून त्यामध्ये प्रत्येक रुग्णांची नोंद

अप्रकाशित पत्र

केली जात असून नव्या नोंदीनुसार भारताची लोकसंख्या १४२ कोटी असतानाही हेमोफिलियाचे प्रमाण १०,००० मागे एक याप्रमाणे एक लाख ४२ हजार रुग्ण असायला हवेत मात्र केवळ २० हजार रुग्ण नोंदवले जात जात असणे, याचा अर्थ इतरांचे अजून निदान झालेले नसल्याने तसेच बी चे प्रमाण लोक लोकसंख्येनुसार किमान ३५००० अपेक्षित असणे, राज्य शासनाच्या वतीने हिमोफिलिया आजाराविषयी जागृती आणि उपचार केंद्र सुरू करण्याकरीता शासनाच्या वतीने प्रत्येक जिल्ह्यातील जिल्हा शासकीय रुग्णालयात, उपजिल्हा रुग्णालयात डे केअर सेंटर सुरू करण्याकरता प्रशासनाकडून कारवाई करण्याची आवश्यकता असतानाही न करणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(१२) **सर्वश्री सुनिल शिंदे,** विलास पोतनीस, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **अन्न व औषध प्रशासन मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"दर्जाच्या निकषांवरून असंख्य प्रकारच्या वादांत अडकलेल्या जॉन्सन ॲण्ड जॉन्सन बेबी पावडरच्या मुलुंड येथील उत्पादक कंपनीने अखेर महाराष्ट्र अन्न व औषध प्रशासनाला परत केलेला परवाना, बाळाचा जन्म आणि बेबी पावडरचा सुवास यांचे एक घट्ट नाते जॉन्सन बेबी पावडरने पिढ्यान् पिढ्या तयार केले असणे, मात्र, या नात्याला तडा देणाऱ्या अनेक घटना घडल्या असणे, जॉन्सनच्या पुणे व नाशिक येथील कारखान्यांमधील नमुने महाराष्ट्र एफडीएच्या तपासणीत सदोष आढळून येणे, त्यावरूनच सन २०२२ मध्ये एफडीएने त्यांच्यावर उत्पादन व विक्री थांबविण्याची कारवाई केली असणे, अमेरिका, कॅनडा या देशांमध्येही या कंपनीच्या पावडरच्या वापरामुळे सामान्यांना त्रास झाल्याची अनेक प्रकरणे पुढे आली असणे, अमेरिका, कॅनडा या देशांमध्ये या कंपनीने नुकसानभरपाई दिलेली असणे, परंतु राज्यात मात्र या पावडरचा वापर केल्याने ज्यांना आरोग्याच्या दृष्टीने विविध प्रकारच्या समस्यांना तोंड द्यावे लागले, त्यांना या कंपनीने कोणतीही नुकसानभरपाई दिली नसणे, राज्य आणि केंद्र स्तरावर औषध-प्रसाधन नियामक यंत्रणांचा अशा प्रकारच्या कंपन्यांवर कोणताही अंकुश नसल्याचे अधोरेखित होणे, त्याचा त्रास मात्र सर्वसामान्य ग्राहक व रुग्णांना सहन करावा लागणे, यास्तव या कंपनीच्या उत्पादनांमुळे ज्या ग्राहक व रुग्णांना त्रास झाला आहे त्यांना सदरहू कंपनीकडून नुकसानभरपाई मिळवून देण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही आणि शासनाची प्रतिक्रिया."

(१३) **सर्वश्री अभिजित वंजारी,** अशोक ऊर्फ भाई जगताप, राजेश राठोड, डॉ. वजाहत मिर्झा, सर्वश्री सतेज ऊर्फ बंटी पाटील, सुधाकर अडबाले, धीरज लिंगाडे, जयंत आसगावकर, डॉ.प्रज्ञा सातव, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व

अप्रकाशित प्रत

सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **गृहनिर्माण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"नागपूर म्हाडा विभागांतर्गत पश्चिम नागपूर विधान सभा क्षेत्रातील गोधणी रोड येथे म्हाडाद्वारे विकसित भूखंड MIG-२० / MIG२६/EWS२१० यातील २१० भूखंडाकरिता दिनांक २० जुलै, १९९५ रोजी वर्तमानपत्रामधील जाहिरातीनुसार भूखंड आवंटित करण्याकरिता LIG आणि EWS प्रवर्गातील लोकांचे अर्ज मागविण्यात येणे, त्यानुसार सन १९९९-२००० या वर्षामध्ये MIG प्रवर्गात २०, LIG प्रर्वगामध्ये ७६ आणि EWS प्रर्वगामध्ये २१० असे एकूण ३०६ भूखंड नियमाप्रमाणे लोकांना आवंटित करण्यात येणे, यासंबंधी संबंधित लोकांनी म्हाडामध्ये आवंटित केलेल्या भूखंडा ऐवजी संपूर्ण रक्कम जमा करण्यात येणे, परंतु गेल्या २७ वर्षापासून म्हाडाच्या या भूखंडावरील आवंटित केलेल्या भूखंडाचा प्रत्यक्षात ताबा वरील ३०६ लोकांना देण्यात आला नसणे, LIG आणि EWS प्रवर्गातील नागपूर विभागातील अनेक कामगारांनी आपल्या मिळकतीच्या पैशातून आवंटित केलेल्या भूखंडाकरिता नियमानुसार रक्कम जमा केल्यावरही अजूनपर्यंत प्रत्यक्षात त्या भूखंडाचा ताबा मोजणी करून संबंधित लोकांना दिला गेला नसणे, त्यामुळे २७ वर्षापासून हे लोक आपल्या भूखंडासाठी आणि घरासाठी अजूनही प्रतिक्षा करीत असणे, यासंबंधी संबंधित लोकांनी शेकडो वेळा म्हाडाच्या कार्यालयामध्ये लेखी व तोंडी निवेदन देऊन सुध्दा त्यांना प्रत्येकवेळी उडवाउडवीचे उत्तरे देण्यात येणे, या ३०६ लोकांपैकी ६ लोक मृत्यू पावले असून त्यांच्या वारसदारांना सुध्दा भूखंड मिळाले नसणे, अनेकदा म्हाडाच्या कार्यालयातून संबंधित लोकांना या जागेवर रेल्वेचे आरक्षण असल्याचे सांगण्यात आले असणे, कधी नागपूर सुधार प्रन्यासच्या वतीने संबंधित लेआऊट मंजूर झाले नाही तर कधी या सर्व जागेवर अतिक्रमण झाल्यामुळे त्याचे प्रत्यक्षात SLR कार्यालयामार्फत मोजणी होऊ शकली नसणे, या वेगवेगळ्या कारणास्तव हे भूखंड देण्यासाठी म्हाडा असमर्थ ठरली असणे, परंतु प्रत्यक्षात म्हाडाने वर्तमानपत्रात दिलेल्या जाहिरातीनुसार ही प्रक्रिया सुरु करण्यापूर्वी आणि लोकांकडून संबंधित भूखंडाचे नियमाप्रमाणे पैसे वसूल करण्यापूर्वी संबंधित लेआऊट अभिन्यास मंजूर करून घेणे गरजेचे असून त्या जागेवर कुठल्या प्रकारचे शासकीय आरक्षण आहे किंवा कसे याची खात्री करायला पाहिजे होती, तसेच लोकांकडून पैसे स्वीकारल्यानंतर आणि कागदोपत्री भूखंड आवंटित केल्यानंतर ३ महिन्याच्या आत SLR कडून संपूर्ण अभिन्यासाची रीतसर मोजणी करून भौतिकरित्या भूखंड संबंधित व्यक्तींना हॅन्डओवर आवश्यक असणे, परंतु म्हाडाच्या गलथान कारभारामुळे ३०० पेक्षा जास्त लोकांचे जीवन उध्वस्त झाले असणे, २७ वर्षापासून अजूनही म्हाडाच्या कार्यालयामध्ये पायऱ्या झिजवून त्यांना न्याय न मिळणे, याबाबतीत शासनाने त्वरित चौकशी करुन ज्या अधिकाऱ्यांच्या हातून ही अक्षम्य चूक झाली, त्यांचेवर कायदेशीर करावयाची कारवाई तसेच संबंधित जमिनीचा अतिक्रमणविरहित ताबा घेऊन तात्काळ मोजणी करून आणि त्या

अग्रिम प्रत

अभिन्यासाला संबंधित प्राधिकरणाकडून मंजूरी मिळवून ज्या लोकांनी २७ वर्ष पहिले पैसे भरून आवंटन करून घेतले त्यांना तात्काळ भूखंड उपलब्ध करून देण्यासाठी तसेच २७ वर्षामध्ये प्रत्यक्ष भूखंडाचे आवंटन न केल्यामुळे जितके पैसे लोकांनी म्हाडामध्ये जमा केले त्यावर १८ टक्के व्याज त्या सर्व लोकांना भरपाईच्या स्वरूपामध्ये देण्याचे आदेश निर्गमित करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

(१४) **श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप,** डॉ.प्रज्ञा सातव, सर्वश्री राजेश राठोड अभिजित वंजारी, जयंत आसगावकर, धीरज लिंगाडे, सुधाकर अडबाले, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **राज्य उत्पादन शुल्क मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यातील गृह विभागाच्या राज्य उत्पादन शुल्काच्या क्रमांक इएसटी-२०२१/प्र.क्र.९३/राउशु-१, दिनांक २५-०५-२०१९ च्या अनुषंगाने गणवेशधारी अधिकारी व कर्मचारी यांच्या बदलीबाबतचे धोरण निश्चित करण्यासाठी आदेश पारीत करण्यात आले असून या आदेशात नमूद केल्याप्रमाणे एका महसूल विभागात ९ वर्षे पुर्ण झालेल्या निरीक्षकांना दुसऱ्या महसूल विभागात बदली करण्यात यावे, असे असताना निरीक्षक पदावरील चार अधिकाऱ्यांच्या संगनमताने सन २०२३ ते सन २०२६ साठी करण्यात येणे, शासनाने जारी केलेल्या पत्रात नऊ वर्षे पूर्ण झालेल्या निरीक्षकांना एका महसूल विभागातून दुसऱ्या महसूल विभागात बदली करण्यात यावी, असे स्पष्ट असताना चारही अधिकाऱ्यांच्या बदल्या नियमबाह्य पद्धतीने करण्यात येऊन याबद्दल बदली प्रक्रियेमध्ये संबंधित अधिकाऱ्यांच्या संगनमताने फार मोठा करोडो रुपयांचा घोटाळा व भ्रष्टाचार झाल्याचे उघडकीस आले असून या प्रकरणी सखोल चौकशी करुन नियमबाह्य झालेल्या बदल्या रद्द करण्याबाबत करावयाची कार्यवाही व या प्रकरणातील दोषी असलेल्यांवर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

अस्वीकृत प्रत

## (दुपारी १२.०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे**

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे —**

(१) **उच्च व तंत्रशिक्षण मंत्री** : "संदिप विद्यापीठ, नाशिक यांचे सन २०१७-२०१८ ते सन २०२१-२०२२ या वर्षांचे वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(२) आदिवासी विकास मंत्री** : "शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्यादित, नाशिक यांचा सन २०१९-२०२० या वर्षाचा एकवीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(३) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** : "महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित यांचे सन २०१७-२०१८ या वर्षाचा बावीसावा वार्षिक अहवाल तसेच त्यांच्या दुय्यम कंपन्यांचे एकत्रित वार्षिक अहवाल तसेच दुय्यम कंपन्यांचे वित्तीय वर्ष व सन २०१८ पर्यंतचे वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(४) रोजगार हमी योजना मंत्री** : "महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना - महाराष्ट्र व राज्य रोजगार हमी योजना यांचा सन २०२२-२०२३ या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(५) उद्योग मंत्री** : "महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांचे सन २०२१-२०२२ सन २०२२-२०२३ व सन २०२३-२०२४ चे मूळ अर्थसंकल्प व कामाचे कार्यक्रमविषयक पत्रक तसेच सन २०२० २०२१ सन २०२१-२०२२ व सन २०२२-२०२३ या वर्षांचे सुधारीत अंदाजपत्रक" सभागृहासमोर ठेवतील.

तीन : (क) **म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना — (असल्यास).**

(ख) **म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनांची निवेदने —**

**(मंगळवार, दिनांक २५ जुलै, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली प्रलंबित म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनेचे निवेदन) —**

**श्री.सचिन अहिर, वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील **सूचना क्रमांक ३** वर **मदत व पुनर्वसन मंत्री** निवेदन करतील :-

भिमा आसखेड (ता.खेड, जि.पुणे) येथील प्रकल्पग्रस्त आंदोलक शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांबाबत.

अप्रकाशित प्रत

**चार : लक्षवेधी सूचना — (म.वि.प. नियम १०१ अन्वये) —**

(१) **श्री.सुरेश धस, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिका येथे भुयारी गटारीसाठी स्कीम फेस-२ अंतर्गत सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियानांतर्गत भिवंडी महापालिकेला भुयारी गटारी योजनेचे योग्य प्रकारे व नियोजनबद्ध भिवंडी शहरातील मल:निसारणाचे काम करता यावे म्हणून सल्लागार व शासनाकडून देखरेख म्हणून ५ संस्थेची नेमणूक केलेली असणे, भुयारी गटारी योजना निविदा ४६२ कोटी रुपयांची असून त्यापैकी ६ एचटीपी व १० पंपींग स्टेशन व नादुरुस्त केलेली रस्ते बांधण्याची निविदा झालेली असणे, ते बांधण्यापूर्वी ४ संस्थांनी व महानगरपालिकेने ३३७ कोटी रुपये ठेकेदारास ईगल कन्स्ट्रक्शन यास गैरव्यवहारातून गैरलाभ मिळून अदा केलेले असणे, भुयारी गटार योजना ही सरकारी योजना न राबवता भिवंडीच्या जनतेसाठी फसवी योजना राबवण्यात येऊन सदर निविदेमध्ये ५० कोटी रुपये परस्पर गैरव्यवहारातून गैरलाभ मिळवून देण्यात आलेला असणे, याच्या सखोल चौकशीसाठी कमिटी नेमून संबंधितांवर कारवाई करणे गरजेचे असून या भुयारी गटार फसव्या योजनेमध्ये अनियमितता व अगुणवत्ता आढळून आल्याने ठेकेदाराच्या निकृष्ट कामामुळे रस्ते नादुरुस्त होऊन २००० लोकांचे अपघात झालेले असणे, त्यामध्ये अनेक लोक मृत्युमुखीही पडलेले असणे, यास सर्वस्वी जबाबदार ठेकेदार व महानगरपालिकेचे अधिकारी असून सदर निविदेमध्ये व निकृष्ट दर्जाच्या कामामध्ये मोठ्या प्रमाणावर घोटाळा झालेला असून याची सखोल चौकशी होण्यासाठी दिनांक २८ फेब्रुवारी, २०२३ रोजी मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे तक्रार दाखल करण्यात आलेली असून संबंधित संस्थानी केलेले गैरव्यवहार व ठेकेदार यांच्यावरती कठोरात कठोर कारवाई करण्यासाठी जनतेत निर्माण झालेला तीव्र असंतोष व प्रखर संतापाची भावना यावर शासनाची भूमिका व तातडीने करावयाची कार्यवाही."

(२) **श्री.महादेव जानकर, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"महाराष्ट्र होमगार्ड सैनिकांना ३६५ दिवस नियमित करण्याबाबत पावसाळी अधिवेशनात तीव्र आंदोलन करण्याचा दिलेला इशारा, नागपूर येथे दिनांक २८ जानेवारी २०१९ ला महाराष्ट्र होमगार्ड सैनिकांनी ३६५ दिवसांचे केलेले आंदोलन, मागील १५ वर्षांपासून होमगार्ड सैनिकांनी नियमित रोजगार मिळावा म्हणून सातत्याने शासनाकडे केलेले निवेदन, तत्कालिन मुख्यमंत्री महोदयांनी आंदोलनाचा पवित्रा गांभीर्याने घेऊन दिनांक ३ मार्च,२०१९ रोजी

अस्वाक्षरित प्रत

पोलिस रेगुलर कॉलाऊट या नावाने शासन निर्णय काढून होमगार्डस्‌ना कमीत कमी १८० दिवसाचे नियमित काम दिनांक १३ ऑगस्ट,२०१९ पासून सुरु करणे, परंतु ६ महिन्यांनंतर होमगार्ड सैनिकांकरिता फंड उपलब्ध नसल्याचे कारण सांगून दिनांक १० जानेवारी, २०२० रोजी होमगार्डचे १८० दिवसांचे बंदोबस्ताचे काम बंद करण्यात येणे, होमगार्ड सैनिकांना फक्त खोटे आमिष आश्वासन देऊन होमगार्ड सैनिकांच्या संविधानिक न्यायिक मागण्यांना दाखविण्यात येत असलेली केराची टोपली, महाराष्ट्र होमगार्ड सैनिकांनी आपल्या न्याय १७ मागण्यांसंदर्भात शासनाकडे केलेले निवेदन, बॉम्बे होमगार्ड ॲक्ट १९४७ ची सुधारणा अथवा बदल करणे, दिनांक १७ जानेवारी, १९८४ च्या आदेशाची अंमलबजावणी करुन होमगार्डना ३६५ दिवस नियमित करणे, दर ३ वर्षांनी होणाऱ्या पुनर्नोंदणी पुर्ननियुक्ती प्रणाली अथवा पध्दत कायमस्वरुपी बंद करणे, साप्ताहिक परेड चा भत्ता, कर्तव्य भत्त्याचा दर समप्रमाणानुसार देयक असावा, होमगार्ड सैनिकांना कर्मचाऱ्यांची जुनी पेन्शन योजना लागू करण्यात यावी, होमगार्ड सैनिकांच्या तसेच होमगार्ड विभागाचा दर्जा व वर्ग ठरविण्यात यावे, होमगार्ड पाल्यांना प्रशासकीय सेवाभरती मध्ये अनुकंपा तत्व प्रणालीने स्थान मिळावे या व अन्य मागण्यांकडे होत असलेले दुर्लक्ष, परिणामी होमगार्ड सैनिकांमध्ये पसरलेले असंतोषाचे वातावरण, महाराष्ट्र होमगार्ड सैनिकांच्या प्रमुख १७ मागण्यांसंदर्भात शासनाने गांभीर्याने लक्ष घालून शासन स्तरावर करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

(३) **सर्वश्री जयंत आसगावकर,** सतेज ऊर्फ बंटी पाटील, अभिजित वंजारी, अशोक ऊर्फ भाई जगताप, राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.प्रज्ञा सातव, सर्वश्री सुधाकर अडबाले, धीरज लिंगाडे, किरण सरनाईक, विक्रम काळे, सत्यजीत तांबे, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"महाराष्ट्रात सन २००१ पूर्वी स्थापना झालेल्या ८९ शिक्षणशास्त्र (बी.एड.) महाविद्यालयांना १०० टक्के अनुदान मंजूर करावे या प्रमुख मागणीसाठी विनाअनुदानित, शिक्षणशास्त्र महाविद्यालय प्राचार्य, प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी असोसिएशन, कल्याण, जि.ठाणे, यांचे दिनांक २१ फेब्रुवारी, २०२३ पासून मुंबईतील आझाद मैदानावर धरणे आंदोलन सुरु असल्याचे माहे जुलै, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले असणे, राज्यातील सन २००१ पूर्वी स्थापना झालेल्या एकूण ८९ शिक्षणशास्त्र (बी.एड.) महाविद्यालयांना शासनातर्फे १०० टक्के अनुदान मिळावे याकरिता हे आंदोलन सुरु असणे, मागील ४७ वर्षापासून राज्यात एकाही शिक्षणशास्त्र महाविद्यालयाला अनुदान दिले गेले नसणे, अनुदानाची वाट पाहून एक पिढी

अप्रकाशित

सेवानिवृत्त होऊनही जाणे, सन २०१४ मध्ये शिक्षण विभागाने सकारात्मक शिफारससुध्दा केली असणे, परंतु दुष्काळी परिस्थितीचे कारण दाखवून वित्त विभागाने प्रस्ताव नाकारणे, अशाप्रकारे वारंवार सकारात्मक बैठका घेऊन कर्मचाऱ्यांना प्रलोभने दाखवणे, शिक्षकांना अनुदानाअभावी आर्थिक विवंचनेचा सामना करावा लागणे, मागील अनेक वर्षापासून प्रलंबित असलेल्या शिक्षणशास्त्र (बी.एड.) महाविद्यालयांच्या मागण्यांबाबत शासन आवश्यक कार्यवाही करीत नसल्याने प्राचार्य, प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांमध्ये निर्माण झालेली चिड व असंतोषाची भावना लक्षात घेता याबाबत शासनाने चौकशी करुन करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(४) **श्री.रामदास आंबटकर, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिनस्त असलेली आकृती रायझींग सिटी, सार्वजनिक बांधकाम विभाग मैदान, मानखुर्द लिंक रोड, घाटकोपर (पूर्व), या ठिकाणी शासकीय कर्मचारी वसाहती बांधण्यात आलेल्या असणे, सदरहू वसाहतीजवळ सुरु असलेल्या Ready-mix concrete Plant मुळे शासकीय वसाहतीमध्ये तसेच वसाहतीमधील रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात धुळीचे साम्राज्य पसरत असणे, धुळीच्या वातावरणामुळे शासकीय वसाहतीमधील रहिवाशांना आरोग्याच्या समस्यांना सामोरे जावे लागत असणे, त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाने आरएमसी प्लांट दुसऱ्या जागेवर स्थलांतर करावयास सांगूनही अद्यापपर्यंत स्थलांतर करण्यात आले नसणे, आरएमसी प्लांटमुळे सतत अवजड वाहनांची वाहतूक होत असल्यामुळे वर्षभरापूर्वी तयार केलेल्या डांबरी रस्त्यांची दुरावस्था होऊन रस्त्यावर हलकी वाहने चालवीणे धोक्याचे झाले असणे, मानखुर्द लिंक रोड या शासकीय वसाहतीमध्ये प्रवेश करण्यासाठी असलेल्या मुख्य रस्त्याने बाजूला असलेल्या मॅनग्रोव्हजमुळे वसाहत परिसरात सरपटणाऱ्या प्राण्यांचा मोठ्या प्रमाणात वावर असणे, घाटकोपर रेल्वे स्थानकापासून ४ कि.मी. च्या अंतरासाठी शासकीय वसाहतीपर्यंत बस सेवा उपलब्ध नसल्यामुळे स्थानिक रहिवाशांना पायपीट करावी लागत असणे, तसेच पावसाळ्यामध्ये आजुबाजुच्या परिसरात मोठ्या प्रमाणावर घाणीचे साम्राज्य पसरलेले असल्यामुळे परिसरातील शालेय विद्यार्थी व प्रवाशांना घाणीच्या रस्त्यावरुनच ये-जा करावी लागत असणे, शासकीय वसाहती सभोवताली असलेल्या झोपडपट्टीमुळे येथे वास्तव्यास असलेले गुंड प्रवृत्तीचे लोक/गर्दुल्ले यांच्यामुळे वसाहतीमध्ये ये-जा करणाऱ्या रहिवाशी महिला समवेत छेडछाड, लुटमारीच्या घटना असल्यामुळे शासकीय वसाहतीत

अग्रिम प्रत

वास्तव्यास असलेल्या महिला वर्गात भितीचे वातावरण निर्माण झाले असणे, वसाहतीच्या लगत असलेल्या ओपन स्पेस परिसरात रात्रीच्यावेळी अंधारात दारु पिणारे व नशेची द्रव्ये सेवन करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर लोकांचा वावर होत असणे, शासकीय वसाहतीत वैद्यकीय सुविधा व रुग्णालय नसल्यामुळे वैद्यकीय सुविधेसाठी परिसर सोडून दोन-तीन किलोमीटर बाहेर यावे लागत असणे, शासकीय वसाहतीत इमारत क्र. ४ ते १० असलेल्या लिफ्ट वारंवार नादुरुस्त होत असल्यामुळे वसाहतीतील रहिवाशांना त्रास सहन करावा लागत असणे, लिफ्ट नादुरुस्त झाल्याची तक्रार करुनही लिफ्टची दुरुस्ती करण्यात येत नसणे, इमारत क्र.४ मधील एक लिफ्ट मागच्या पावसाळ्यापासून नादुरुस्त असून अद्याप दुरुस्त झालेली नसणे, सदर शासकीय वसाहतीत स्वच्छतेचा अभाव असल्यामुळे वसाहतीत मोठ्या प्रामणात उंदीर आणि डासांचा सुळसुळाट वाढला असून रहिवाशांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला असणे, शासकीय वसाहतीत मलनिस्सारण व सांडपाण्यासाठी उभारण्यात आलेल्या पाईपमधून लिकेज होत असल्यामुळे मोठ्या प्रमाणावर परिसरात दुर्गंधी पसरणे, त्यामुळे इमारतीच्या भिंतीला पाणी लागत असल्यामुळे वसाहतीतील इमारतीस धोका निर्माण झाला असणे, शासकीय वसाहतीच्या परिसराला संरक्षण भिंत नसल्यामुळे व सुरक्षारक्षकांची अपुरी संख्या असल्यामुळे वसाहतीत चोरी होण्याच्या घटना घडत असणे, त्यामुळे शासकीय वसाहतीला संरक्षण भिंत लवकरात लवकर बांधणे व पुरेशी सुरक्षारक्षकांची संख्या वाढविणे आवश्यक असणे, शासकीय वसाहतीला लागून असलेल्या नाल्यामुळे नागरिकांना आरोग्याच्या समस्या निर्माण होत असल्यामुळे नाल्याची पुर्णपणे स्वच्छता करुन कायमस्वरुपी प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्याची आवश्यकता असणे, पंतनगर, घाटकोपर (पूर्व) येथील इमारत क्रमांक १८६ या शासकीय इमारतीमधील रहिवाशांनी इमारतीची डागडुजी, इमारतीमधील रहिवाशांच्या सुरक्षेकरीता सुरक्षारक्षक नसणे, यासंदर्भात रहिवाशांनी वारंवार विनंती अर्ज सादर करुन सार्वजनिक बांधकाम विभागातील अधिकारी/कर्मचारी यांचे रहिवाशांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष होत असणे, शासनाच्या उदासिनतेमुळे येथील रहिवाशी असलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांमध्ये मोठया प्रमाणात असंतोषाचे वातावरण निर्माण झाले असणे, त्यामुळे उपरोक्त शासकीय वसाहतीच्या इमारतीमधील रहिवाशांच्या मागण्यांची पूर्तता करुन इमारतीची देखभाल, दुरुस्ती, निगराणी व स्वच्छता ठेवण्याच्या दृष्टीने शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**पाच : म.वि.प. नियम १०१ — अ अन्वये विशेष उल्लेख — (असल्यास)**

**- मध्यंतर -**

अप्रकाशित

**सहा : म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा –**

**(बुधवार, दिनांक २६ जुलै, २०२३ व गुरुवार, दिनांक २७ जुलै, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली प्रलंबित म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा)** –

**श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे,** श्रीमती उमा खापरे, सर्वश्री रमेशदादा पाटील, सचिन अहिर, आमश्या पाडवी, नरेंद्र दराडे, **वि.प.स.** यांची म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा –

"राज्यातील सर्व स्वयंअर्थसहाय्य शाळांना आर.टी.ई. प्रतिपूर्ती शुल्क अर्थसंकल्पामध्ये २०० कोटी रुपये मंजूर केले असणे व त्यापैकी प्रतिपूर्ती शुल्क म्हणून ८४ कोटी रुपये शासनाने दिले असून शासनाकडे त्यापैकी उर्वरित ११६ कोटी रुपये प्रलंबित असून राज्यातील अडचणीत व कर्जबाजारी शाळांना लवकरात लवकर हे देण्याची आवश्यकता, राज्यातील शाळा अडचणीत असणे, कर्जबाजारी असणे, तसेच कोरोना काळात सदर शाळांनी ऑनलाइन शिक्षण दिलेले असून तेव्हापासून राज्यातील ज्या स्वयंअर्थसहाय्य शाळांनी २५% विद्यार्थ्यांना प्रवेश दिलेले असणे, प्रतिपूर्तीमध्ये शासनाकडून फक्त शिक्षण शुल्क दिले जात असणे, मात्र पालकांकडून गणवेश व शैक्षणिक साहित्यासाठी आग्रह धरला जात असणे, तसेच अधिकारी देखील शैक्षणिक साहित्य व अन्य गोष्टी संबंधीत विद्यार्थ्यांना द्यावे म्हणून सक्ती करीत असणे, शासनाकडून मिळणाऱ्या शैक्षणिक शुल्का व्यतिरिक्त गणवेश व शैक्षणिक साहित्यासाठी जादाचा लागणारा निधी उपलब्ध करून अशा शाळांना प्रलंबित प्रतिपूर्ती शुल्क लवकरात लवकर अदा करण्यात यावेत, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**सात : शासकीय विधेयके –**

**विधानसभेने संमत केल्याप्रमाणे – विचार, खंडशः विचार व संमत करणे.**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २७ - नोंदणी (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२३"

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अंबादास दानवे, शशिकांत शिंदे, सतेज ऊर्फ बंटी पाटील, सचिन अहिर, एकनाथराव खडसे, अभिजीत वंजारी, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २७ - नोंदणी (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२३" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ७५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात

यावे."

---

आठ : (क) **(मंगळवार, दिनांक २५ जुलै, २०२३ व बुधवार, दिनांक २६ जुलै, २०२३ व गुरुवार, दिनांक २७ जुलै, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव) —**

**सर्वश्री प्रविण दरेकर**, विजय ऊर्फ भाई गिरकर, अमोल मिटकरी, प्रसाद लाड, सतिश चव्हाण, विक्रम काळे, श्रीमती उमा खापरे, सर्वश्री निरंजन डावखरे, प्रविण दटके, अनिकेत तटकरे, सुरेश धस, गोपिचंद पडळकर, प्रविण पोटे-पाटील, चंद्रशेखर बावनकुळे, श्रीकांत भारतीय, रामदास आंबटकर, रणजितसिंह मोहिते-पाटील, प्रा.राम शिंदे, सर्वश्री निलय नाईक, राजहंस सिंह, रामराव पाटील, रमेशदादा पाटील, वसंत खंडेलवाल, रमेश कराड, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव —**

"राज्यात कायदा व सुव्यवस्था चोख ठेवण्याच्या दृष्टीने विद्यमान शासनाने सेफ्टीचे पर्सेप्शन तयार केले असणे, अनादी काळापासून प्रत्येक राज्य व्यवस्थेमध्ये गुन्हे घडत असले तरी देशातील अन्य राज्यांच्या दृष्टीने आपला महाराष्ट्र गुन्हेगारी रोखण्यात आघाडीवर असल्याचे निदर्शनास येणे, गुन्हेगारीचे समूळ उच्चाटन करण्यासाठी मागील वर्षभरात अनेक गुन्हेगारांवर तडीपारीची कारवाई केली असणे, २३९ लोकांवर एमपीडीए अंतर्गत कारवाई करण्यात येणे, अंमली पदार्थांच्या संदर्भात २०२२ मध्ये हजारो गुन्हे दाखल असून मोठ्या प्रमाणावर अंमली पदार्थ जप्त करण्यात येणे, खंडणीबाबत घडणारे गुन्हे मोठ्या प्रमाणात कमी झाले असणे, प्रत्येक जिल्ह्यात जिल्हाधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली अँन्टी नार्कोटीक सेल तयार करण्यात आला असणे, शाळा-महाविद्यालयांच्या परिसरात नार्कोटीकच्या संदर्भात शासनाने झिरो टोलरन्स पॉलीसी सुरु केली असणे, विद्यमान शासनाने २० हजार पोलीस भरतीची एकत्रित प्रक्रिया राबवून सर्व रिक्त पदे भरण्यासाठी पद भरतीचे निर्बंध शिथील केले असणे, पोलीस शिपाई ते पोलीस निरीक्षक यांना वर्षाकाठी देय असलेल्या नैमितिक रजा १२ ऐवजी २० करण्याचा निर्णय घेतला असणे, पोलीसांना सवलतीच्या दरात गृह कर्जासाठी सन २०१७ ची लोकप्रिय योजना जी मागील शासनाने बंद केली होती ती पुन्हा लागू केली असणे, राज्यात ३४ फॉरेन्सिक लॅब तयार करण्यात आल्या असून टेक्निकल एव्हिडन्स हा ह्युमन एव्हिडन्सपेक्षा बोलका असल्याने व ह्युमन एव्हिडन्स होस्टाईल होऊ शकतो परंतु टेक्निकल एव्हिडन्स होस्टाईल होऊ शकत नाही ही वस्तुस्थिती विचारात घेता फॉरेन्सिक लॅब अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने शासनाकडून प्रयत्न होत असल्याचे निदर्शनास येणे, राज्य पोलीस व मुंबई पोलीस यांनी ऑपरेशन मुस्कानच्या माध्यमातून आतापर्यंत

अप्रकाशित

सुमारे ३८ हजार बालकांना त्यांच्या घरी सुखरूप पोहचविल्याचे निदर्शनास येणे, देशात हरवलेली बालके व पळून आलेली बालके शोधून त्यांच्या घरापर्यंत पोचविण्याच्या कामात मुंबई व महाराष्ट्र पोलीसांचा प्रथम क्रमांक असल्याचे निदर्शनास येणे, राजकीय व सामाजिक आंदोलनातील गुन्ह्यांमध्ये जून २०२२ पर्यंत दोषारोपपत्र दाखल झालेले खटले मागे घेण्याचा निर्णय घेतला असणे, पोलीस दलातील शिपाई, पोलीस शिपाई, चालक, सशस्त्र पोलीस संवर्गातील विविध कारणास्तव रिक्त झालेली पदे तात्काळ भरण्यास शासनाने मान्यता दिली असणे, राज्यात गणपती व दहिहंडी उत्सवाच्या कालावधीत ज्या गुन्ह्यांमध्ये दिनांक ३१ मार्च, २०२० पर्यंत दोषारोपपत्र दाखल झाले आहेत व ज्या खटल्यांमध्ये अटी-शर्तींची पुर्तता होते असे खटले मागे घेण्याची कार्यवाही सुरू असणे, कोरोना प्रतिबंधक आदेश लागू झाल्यानंतर या आदेशाचे उल्लंघन झाल्यामुळे दिनांक २१ मार्च, २०२० ते दिनांक ३१ मार्च, २०२२ पर्यंत दाखल खटले मागे घेण्याची कायदेशीर कार्यवाही सुरू असणे, पोलीस कर्मचा-यांना पुरेशी निवासस्थाने उपलब्ध करून देण्यासाठी दिर्घकालीन, मध्यमकालीन व तात्काळ अशा तीन टप्प्यांवर उपाययोजना करण्याचा तसेच म्हाडाच्या मदतीने मुंबईतील पोलीस निवासस्थानांचा पुर्नविकास करण्याचा शासनाने निर्णय घेतला असणे, महिलांच्या संदर्भात वेगवेगळ्या जिल्ह्यात विशेष न्यायालये व जलद गती न्यायालये तयार करण्यात येणे, तसेच समुपदेशन केंद्रे स्थापन करण्यात येणे, बलात्काराच्या गुन्ह्यांबाबतीत ६० दिवसात चार्जशीट दाखल होण्याचे प्रमाण १८ टक्क्याहून वाढविण्यात पोलीस प्रशासानाला यश आल्याचे निदर्शनास येणे, राज्यात संवेदनशील असलेल्या नक्षलग्रस्त भागाकरिता शासनाने पुरेसा निधी उपलब्ध केलेला असणे, अनुसूचित जाती-जमाती प्रवर्गाचे रक्षण करण्याच्या दृष्टीने शासन प्राथमिकता देत असल्याने त्यानुषंगाने कन्व्हीक्शनचे प्रमाण वाढविण्यासाठी शासनाचे प्रयत्न असणे, राज्यातील संकटग्रस्त महिलांना तातडीने आवश्यक माहिती व मदत मिळण्यासाठी स्वतंत्र टोल फ्री क्रमांक १८१ महिला हेल्पलाईन सुरू केली असणे, राज्यात स्टीट क्राईम डिटेक्शनमध्ये गुणात्मक बदल करण्याच्या दृष्टीने कमांड ॲण्ड कंट्रोल सिस्टीम प्रकर्षाने राबविण्याचा व आणखी ६ हजार सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचा निर्णय घेतला असणे, राज्यात गणपती व दहिहंडी उत्सव मोकळ्या वातावरणात पार पडावे या दृष्टीने शासनाने त्यावरील निर्बंध उठविले असणे, पंढरपूरला जाणा-या वारक-यांना टोलमाफी केली असणे, गणेशमुर्तीच्या उंचीवरील निर्बंध उठविले असणे, गणेशोत्सवाला कोणतेही शासकीय शुल्क भरावे लागू नये याची दक्षता घेतली असणे, ज्येष्ठ नागरिकांना लुबाडणे, एकाकी राहणाऱ्या ज्येष्ठ दांपत्यांना संरक्षण इत्यादी बाबतीत शासनाने कडक धोरण राबविल्यामुळे ज्येष्ठ नागरिकांसंबंधीच्या गुन्ह्यांत कपात झाली असणे, शासनाने मागील वर्षभरात न्यायव्यवस्था बळकट करण्याच्या दृष्टीने प्रत्येक स्तरावर न्यायालयांची स्थापना करणे व न्यायालयांसाठी नवीन

अग्रिम प्रत

पदे निर्माण करण्याचे धोरण स्वीकारले असणे, राज्यातील कारागृह क्षमतेपेक्षा कैद्यांची संख्या अधिक झाल्याने राज्यात वेगवेगळया जिल्ह्यात नवीन कारागृहे बांधण्याची कार्यवाही सुरु असणे, कायदा व सुव्यवस्थेच्या बाबतीत कठोर उपाययोजना करण्याबाबत शासनाने घेतलेल्या विविध निर्णयांमुळे राज्यातील महिला, बालके, उपेक्षित वंचित घटक व ज्येष्ठ नागरिक चिंतामुक्त व मोकळ्या वातावरणात राहत असल्याचे निदर्शनास येणे, राज्यातील कायदा व सुव्यवस्था अधिक प्रखर करण्याच्या दृष्टीने सर्वंकष विचार विनिमयातून नव-नवे उपक्रम राबविण्याची व त्यायोगे राज्य पोलीस दल अधिक सक्षम करण्याची आवश्यकता व त्याबाबत करावयाची उपाययोजना."

**(ख) (गुरुवार, दिनांक २७ जुलै, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव)** –

**सर्वश्री अंबादास दानवे**, सतेज उर्फ बंटी पाटील, एकनाथराव खडसे, शशिकांत शिंदे, अशोक ऊर्फ भाई जगताप, कपिल पाटील, ॲड.अनिल परब, सर्वश्री नरेंद्र दराडे, अभिजीत वंजारी, सचिन अहिर, राजेश राठोड, सुधाकर अडबाले, विलास पोतनीस, जयंत पाटील, किरण सरनाईक, सुनिल शिंदे, डॉ.प्रज्ञा सातव, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव** –

"राज्यातील नगरपालिका व महानगरपालिकेच्या निवडणुका दीर्घकाळ प्रलंबित असणे, प्रशासकीय नेमणूकीमुळे जनतेच्या कामावर होत असलेला परिणाम, महानगरपालिका, नगरपालिका व जिल्हापरिषदा यांच्या वर्षानुवर्ष निवडणूका झालेल्या नसल्यामुळे वाढता भ्रष्टाचार, मुंबईतील रस्ते, फूटपाथ, उद्याने, पूल, समुद्रकिनारे यांचे सौंदर्यीकरण व सुशोभीकरणाच्या कामाच्या नावाने जनतेच्या पैशांची सुरु असलेली लुट व त्यामध्ये झालेली अनियमितता, सुशोभीकरण करण्यासाठी निकृष्ट दर्जाच्या साहित्याचा वापर केलेला असणे, पदपथाची व रस्त्यांची कामे अपुर्णावस्थेत असल्याने पावसाळ्यात पाणी साचल्याने नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागणे, महानगरपालिकेच्या रुग्णालयांमध्ये अग्निशमन यंत्रणा कार्यान्वित नसणे, मुंबई उपनगरातील पिण्याच्या पाणी समस्येवर मात करण्यासाठी समुद्राच्या खाऱ्या पाण्यापासून पिण्यायोग्य पाणी तयार करण्याचा प्रकल्प राबविण्याकडे होत असलेले दुर्लक्ष, वॉर्डच्या लोकसंख्येप्रमाणे निधीचे वाटप न करणे, मुंबईत साथीच्या रुग्णसंख्येत दुपटीने झालेली वाढ, ठाण्यात विकासाच्या नावाखाली हजारो झाडांची करण्यात आलेली कत्तल, ठाणे शहरातील वाहतुक व्यवस्थेत करण्यात आलेल्या बदलांना नागरिकांचा असलेला विरोध, नैना प्रकल्पांतर्गत आदिवासींच्या जमिनी संपादित करुन विकासकांच्या घश्यात टाकण्याचा सुरु

असलेला प्रयत्न, एमएमआरडीए अंतर्गत विकासकामांसाठी जमिनी संपादित करताना बाधीत झालेल्या प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाकडे होत असलेले दुर्लक्ष, सततचा पाऊस, गारपीट आणि नापिकीमुळे शेतकऱ्यांचे झालेले नुकसान, राज्यात सिंचनाचा अभाव, शेतीमालाला भाव नसल्याने कर्जबाजारीमुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे वाढलेले प्रमाण, राज्यात दरड कोसळण्याच्या घटनेत झालेली वाढ, प्रत्येक जिल्ह्यात आपत्ती व्यवस्थापन कक्ष तयार करण्याची आवश्यकता, राज्यावर आज ६ लाख कोटींचे कर्ज असणे, कर्ज फेडायला परत कर्ज आणि व्याज फेडायलाही कर्जच अशी अवस्था राज्याच्या आर्थिक रचनेची झालेली असणे, देशात सर्वाधिक कर भरणारे राज्य म्हणून महाराष्ट्राचा गौरव असणे, मात्र, महाराष्ट्राच्या वाट्याला फारसा निधी केंद्राकडून दिला जात नसणे, महाराष्ट्राच्या अर्थसंकल्पातील ठळक वैशिष्ट्ये पाहिली असता कर्जावरील चक्रवाढ व्याज वाढत चालले असणे, राज्यात कॅन्सर व इतर आजारांच्या प्रमाण वाढले असून त्याकरिता करण्यात येणारे उपचार महाग झाले असणे, सदर उपचाराकरिता रुग्णालयांकडून नागरिकांची लूट होत असल्याने गरीबांची अडचण होत असणे, त्याकरिता धोरण निश्चित करण्याची गरज, टाटा रुग्णालयाच्या धर्तीवर प्रत्येक जिल्ह्यात रुग्णालय स्थापन करण्याची आवश्यकता, मुख्यमंत्री सहाय्यता निधी गरिबांना मिळत नसणे, धर्मादाय रुग्णालयात अल्प उत्पन्न गटातील नागरिकांना खाटा उपलब्ध न होणे, एम्स च्या धर्तीवर विभागनिहाय रुग्णालय स्थापन करण्याची आवश्यकता, सर्वसामान्यांना परवडणारी घरे मिळण्यासाठी गृहनिर्माण धोरण राबविण्याची आवश्यकता, महारेरामध्ये नोंदणी न करता विकासक नागरिकांची फसवणूक करणे, झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत विकास करताना विकासकांनी जास्तीच्या झोपडपट्टी दाखवून एफ.एस.आय. वाढवून घेऊन शासनाची केलेली फसवणूक, केंद्र शासनाच्या अखत्यारितीतील जमिनी वरील झोपड्यांचा पुनर्विकास, बी.डी.डी च्या पुनर्विकासास होत असलेला विलंब, बी.डी.डी चाळीची दुरवस्था झाली असून दुरुस्ती करण्याच्या दृष्टीने शासन स्तरावर तातडीने करावयाची कार्यवाही, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

अग्रिम प्रत

## — अशासकीय कामकाज —
## (बैठकीच्या अखेरचे २ १/२ तास)

**नऊ : अशासकीय विधेयके :-**

**विचारार्थ -**

**(१)** "सन २०२३ चे वि.प.वि. क्रमांक ६ - महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व

जतन (सुधारणा) विधेयक, २०२३" - श्री.अंबादास दानवे, वि.प.स. यांचे

**(२)** "सन २०२१ चे वि.प.वि. क्रमांक २ - महाराष्ट्र राज्य विशेष मागास प्रवर्ग-अ (एसबीसी-ए) करिता (राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील जागांच्या प्रवेशाचे आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्यांचे किंवा पदांचे) आरक्षण विधेयक, २०२१" - श्री.कपिल पाटील, वि.प.स. यांचे

**(३)** "सन २०२३ चे वि.प.वि. क्रमांक ४ - महाराष्ट्र ग्रामपंचायत (सुधारणा) विधेयक, २०२३" - श्री.अंबादास दानवे, वि.प.स. यांचे

**(४)** "सन २०२३ चे वि.प.वि. क्रमांक १ - महाराष्ट्र राज्यात लैंगिक गुन्ह्यांना प्रवृत्त करणाऱ्या जाहिराती, जाहिरात-फलक लावण्यास, समाज माध्यमांवर व संकेतस्थळांवर प्रसिध्द करण्यास प्रतिबंध करण्याबाबत विधेयक, २०२३" - श्री.अंबादास दानवे, वि.प.स. यांचे

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : २८ जुलै, २०२३

**जितेंद्र भोळे**
सचिव (१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानपरिषद

अस्थायी प्रत